सत्यमेव जयते

# शाश्वत विकास ध्येयांच्या (SDGs) नऊ संकल्पना

## Sustainable Development Goals 9 Themes

# राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान

# महाराष्ट्र राज्य

# सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वैश्विक संकल्पना

संयुक्त राष्ट्र संघाने शाश्वत विकासाच्या उद्देशाने जाहीर केलेल्या ‘जागतिक कार्यक्रम २०३०’ मध्ये १७ शाश्वत विकासाची ध्येये व त्या अंतर्गत १६९ साध्ये यांचा समावेश असून हा कार्यक्रम १ जानेवारी २०१६ पासून लागू झाला आहे. ‘सर्वांना सोबत घेऊन चला’ (Leave no one behind) हा या जागतिक कार्यक्रमाचा गाभा आहे.

जागतिक कार्यक्रम-२०३० ची देशात प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी भारत सरकार कटीबध्द आहे. भारताची राष्ट्रीय विकास ध्येये व ‘सर्वांची योजना सर्वांचा विकास’ किंवा ‘सर्वांसोबत आणि सर्वांसाठी विकास’ ही धोरणे शाश्वत विकासाची ध्येये साध्य करण्यासाठी अनुरूप अशीच आहेत. विविध संस्था, संघटना, खाजगी क्षेत्रे, तरूण, समुदाय आणि घटकांशी समन्वयातून ही शाश्वत विकासाची ध्येये साध्य करणे निश्चितच शक्य होणार आहे.

# शाश्वत विकास ध्येयांच्या (SDGs) नऊ संकल्पना (थिम्स)





# 1) गरिबी मुक्त आणि उपजीविका (रोजगार) वृद्धीस पोषक गाव

## (Poverty free and enhanced livelihoods Village)

**अशा गावासाठी व्हिजन-** गरिबी मुक्त गाव म्हणजे असं गाव, ज्या गावात सर्व समाज घटकांची भरभराट आणि वाढ होण्यासाठी  आवश्यक उपजिविका विकासाची पुरेशी साधने उपलब्ध असतील. असं गाव ज्या गावात कुणीही मागे राहणार नाही यासाठी सर्व समाज घटकांना सामाजिक सुरक्षा उपलब्ध असेल.

गरिबीला अनेक अंगे असतात. त्यात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, लिंगभाव आणि अन्य सामाजिक क्षेत्रातही संधी पासून वंचित राहिल्याने व त्यातून असमानता निर्माण होत असल्याने समाजातील अनेक घटकांना गरिबीचा प्रश्न भेडसावत असतो.

# 1) गरिबी मुक्त आणि उपजीविका (रोजगार) वृद्धीस पोषक गाव
## (Poverty free and enhanced livelihoods Village)

## स्थानिक ध्येये

**1. उपजीविका आणि सामाजिक संरक्षण देणा-या योजनांमध्ये सर्व पात्र लाभार्थी घटकांना सामावून घेणे. उदा. सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) आणि एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) या सारख्या योजनांचा लाभ अधिकाधिक लोकांना मिळवून देणे.**

**2. वैयक्तिक आणि सामुहिक उपक्रमांद्वारे आर्थिक विकास आणि रोजगार निर्मिती करणे.**

**3. शाळेत जाण्याच्या वयात १०० टक्के मुलांची शाळेमध्ये नोंदणी करणे व विदयार्थी : शिक्षक प्रमाणामध्ये समतोल ठेवणे.**

## स्थानिक कार्यवाहीचे मुद्दे

- मिशन अंत्योदय (MA) सर्व्हेक्षण आणि सामाजिक व आर्थिक जात गणना (SECC) च्या माहितीद्वारे बहु वंचित लोकांची यादी निश्चित करणे.
- रोजगार पत्रांचे (Job Card) परिणामकारक वितरण करणे व ते गरजू लोकांना मिळवून देणे.
- सार्वजनिक वितरण प्रणालीवर नोंदी घेण्यासाठी लोकांना आवश्यक सहकार्य करणे.
- कौशल्य विकास प्रशिक्षण, उद्योग व्यवसाय उपक्रम आणि रोजगार निर्मितीद्वारे उत्पन्न वाढ करणे.
- सिंचन व उत्पादकतेत वाढ करणे, दर्जेदार बियाणे, जैविक खते, नवीन माहिती तंत्रज्ञानाची ओळख करुन त्याचा अंगिकार करुन व कृषि विज्ञान केंद्रांचा लाभ घेऊन आपल्या शेत जमिनीची उत्पादकता वाढविणे.
- स्वयं सहय्यता गटांना प्रशिक्षणाद्वारे सक्षम करणे, त्यांना बचतीच्या उपक्रमांमध्ये सहभागी करुन घेणे, गटांना बँकांकडून कर्ज उपलब्ध करून देणे.
- ग्रामपंचायत विकास आराखडा निधी आणि इतर कार्यक्रमांचे अभिसरण करणेकामी नियोजन करणे.